वाचा :- 1) सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रं. मातसं/प्रक्रं-28/39 , दिनांक 03.12.2008
2) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्रं. मातसं/नस्ती-09/110/39/दिनांक 16 सप्टेंबर 2009
3) सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रं. मातसं/नस्ती/09/प्रक्रं89/39/ दि.25 नोव्हेंबर 2009
4) महसुल व वन विभागाचे शासन निर्णय क्रं. संकिर्ण/2010/प्रक्रं63/ल-1 सेल, दि. 27.04.2010

जा.क्र.2010/संगणक कक्ष/महा
जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली
दिनांक 26.11.2010
26/11/2010

**आदेश**

उपरोक्त शासन निर्णयाद्वारे चार गावासाठी 1 महा ई सेवा केंद्र या प्रमाणे हिंगोली जिल्ह्यात शहरी भागात 18 महा ई-सेवा केंद्र व ग्रामीण भागात 177 असे एकुण 195 महा-ई- सेवा केद्र स्थापना करण्यात येणार आहेत. सदर केंद्राद्वारे खाजगी व शासकीय सुविधा कमी श्रमात जनतेस उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

हिंगोली जिल्ह्यात महा-ई-सेवा केंद्र स्थापन करणेसाठी CMS Computers Ltd Mumbai यांचे सोबत शासन स्तरावर झालेले करार व शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयातील निकष आणि सुरक्षेच्या दृष्टिने खालील अटि व शर्तीच्या अधिन राहून या कार्यालयामार्फत मंजुरी मंजुरी देण्यात आलेले / येणारे महा ई सेवा केंद्राद्वारे शासकीय सेवा (G2C) सुरु करणेसाठी मान्यता देण्यात येत आहे.

1) सदर केंद्रा मार्फत वितरीत होणारे प्रमाणपत्र व इतर अभिलेखाचे दर शासनाने ठरवून दिल्यानुसार आकारण्यात यावेत.

2) सदर केंद्रातील हॉर्डवेअर व इतर आवश्यक साहित्य केंद्र चालकाने स्वखर्चाने करावा.

3) या कार्यालया मार्फत पुरवण्यात येणारा Database शी अनियमीतता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावा.